**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2021 = 7.380,*
https://www.srjis.com/issues_data/224
***Peer Reviewed, Refereed & Indexed Journal, Nov-Dec, 2023, Vol- 12/80***
*https://doi.org/10.5281/zenodo.10554389*

# दिव्यांग बालकांच्या समस्या आणि आव्हानानुसार उपक्रम निर्मिती करून त्याची परिणामकारकता अभ्यासणे

**सचिन भास्कर कुलसंगे**

(पीएचडी - दूरशिक्षण)पीएचडी विद्यार्थी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा.(डॉ) माधुरी सोनवणे**

(संचालक व प्राध्यापक) कृषिविज्ञान, विद्याशाखा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**Paper Received On:** 25 Dec 2023
**Peer Reviewed On:** 28 Dec 2023
**Published On:** 01 Jan 2024

## प्रस्तावना : -

शिक्षण घेणे हा प्रत्येक मुलाचा मूलभूत अधिकार आहे. 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९' (The Right to Education Act २००९) RTE Act २००९ अन्वये तसेच प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाच्या उद्दिष्टानुसार प्रत्येक बालकास प्राथमिक शिक्षण हे घराजवळील नियमित शाळेत पूर्ण करण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे. त्यात (Children With Special Needs) विशेष गरजा असणाऱ्या बालकांचा देखील समावेश आहे. मूल कोणतेही असो , प्रत्येक बालकास शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. त्यामुळे प्रत्येक मूल शिकू शकते, हा विश्वास प्रत्येकांनी मनी बाळगणे आवश्यक आहे.

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या विकासात्मक समावेशनसाठी अपंग समावेशित शिक्षण हा उपक्रम राबविण्यात आला. सध्या 'समग्र शिक्षा' अंतर्गत उपक्रमाची यशस्वीता लक्षात घेता, तयार केलेले अनुकुलित वातावरण ,वर्ग सर्वच मुलांसाठी प्रभावी ठरत असून आता समावेशित शिक्षण सर्वच घटकातील मुलांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी प्रभावी ठरत आहे.

समाजामध्ये आपल्या सभोवताली आपणास भिन्न प्रकारचे व्यक्ती, बालक दिसून येतात. त्यामध्ये भिन्न विचारसरणी,संस्कृती, जात, धर्म, पंथ, शारीरिक, मानसिक, भावनिक अशा सर्वांगीण गोष्टीचा विचार करता प्रत्येकजण वेगळा आहे आणि प्रत्येकाच्या गरजा देखील भिन्न प्रकारच्या असल्याचे दिसून येते त्यामुळे शिक्षण व्यवस्थेमध्ये जवळच्या शाळेत शिक्षण घेणारा प्रत्येक बालक हा वेगळा आहे. कमी-अधिक प्रमाणात प्रत्येकामध्ये वेगवेगळे कौशल्य व क्षमता असतात. ज्यावेळी आपण प्रत्येक मुलाला स्व-ची ओळख (Self Awareness) करतो तेव्हा खरोखरच प्रत्येकाचे हे विविध सुप्त कलागुण आपणास दिसून येतात.

**संशोधन विधान -**

"दिव्यांग बालकांच्या समस्या आणि आव्हानानुसार उपक्रम निर्मिती करून त्याची परिणामकारकता अभ्यासणे"

**संशोधनाची उद्दिष्टे-**

1) दिव्यांग बालकांचे अध्ययन स्तर निश्चित करून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.
2) दिव्यांग बालकांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी येणाऱ्या अडचणीं व आव्हानांचे विश्लेषण करणे.
3) दिव्यांग बालकांचा अध्ययन स्तर निश्चित करून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी उपाययोजनांचा परिणाम अभ्यासणे

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**संशोधनाची गृहीतके-**

1) अध्ययन स्तर निश्चित करून गुणवत्तापूर्ण शिक्षण दिल्याने सामान्य बालकांप्रमाणेच दिव्यांग बालकांचा व्यक्तिमत्व विकास होतो.
2) सामान्य विद्यार्थ्याप्रमाणेच दिव्यांग बालकांमध्ये अनेक कौशल्य शिकण्याची कला असते.

**व्याप्ती व मर्यादा :**

सदर संशोधन गडचिरोली जिल्हातर्गत चामोर्शी तालुक्यातील विविध जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षण घेणारे 12 दिव्यांग विद्यार्थी व त्यांना अध्यापन करणाऱ्या शिक्षकांपुरतेच मर्यादित आहे.

**परिकल्पना :**

1) शिक्षकांना दिव्यांग बालकांचा अध्ययन स्तर निश्चित करून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी येणाऱ्या समस्या व आव्हानांचा शोध घेतल्याने त्यांचा सर्वांगीण विकास व त्यांना दर्जेदार अध्यापन करण्यासाठी निश्चित दिशा प्राप्त होते.
2) दिव्यांग बालकांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी शिक्षकांची भूमिका महत्वाची असते.

**संशोधन कार्यपद्धती :-**

प्रस्तुत संशोधनासाठी प्रायोगिक पद्धतीचा वापर केला आहे. सदर शाळेतील दिव्यांग विद्यार्थ्यांचा प्रथम सत्र परीक्षेत अप्रगत असल्याचे दिसुन आले असल्याने संशोधकाला दिव्यांग विद्यार्थी अप्रगत असल्याची कारणे कोणती आहेत वर्गानुसार कोणत्या अध्ययन स्तर त्याने पूर्ण केले नाही हे जाणून घेण्यासाठी सर्वप्रथम सबंधित विद्यार्थ्यांची अध्ययन स्तरावर आधारित पूर्व चाचणी घेण्यात आली. पूर्व चाचणीचे विश्लेषण करण्यात आले. सदर चाचणीच्या विश्लेषनानंतर अधिक माहितीसाठी सबंधित शाळेच्या शिक्षकांच्या मुलाखती घेण्यात आल्या

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

मुलाखती दरम्यान अध्यापन करणारे शिक्षक हे विशेष शिक्षण दृष्टीने प्रशिक्षित नाहीत असे प्रथमत: लक्षात आले त्यामुळे सबंधित 8 शिक्षकांना निवडून त्यांना दिव्यांग बालकांना अध्यापन करण्यामागील अडचणी कोणत्या याचा प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे शोध घेतला. विद्यार्थ्यांच्या अध्ययन स्तर साध्य होण्यासाठी 60 दिवशीय उपक्रम प्रभावी राबविण्यात आले. व शेवटी उत्तर चाचणी घेण्यात आली व चाचणीचे विश्लेषण करण्यात आले व अध्ययन स्तर जाणून घेण्यात आले

**जनसंख्या :-**

गडचिरोली जिल्हातील चामोर्शी तालुका अंतर्गत येनापूर केंद्रातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षण घेणारे सर्व दिव्यांग विद्यार्थी प्रस्तुत संशोधनासाठी ग्राह्य धरण्यात आले आहेत.

**न्यादर्श व नमुना :-**

गडचिरोली जिल्हातर्गत चामोर्शी तालुक्यातील 8 जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या एकूण 12 विद्यार्थ्यांपैकी 12 विद्यार्थ्यांची निवड केली आहे.

| अ. क्र. | विदयार्थ्याचे नाव | शाळेचे नाव | प्राप्त गुण |
|---|---|---|---|
| 1 | अध्ययनार्थी 1 | जि.प.प्राथ.शाळा,दुर्गापूर | २ |
| 2 | अध्ययनार्थी 2 | जि.प.प्राथ.शाळा,अड्याळ | २ |
| 3 | अध्ययनार्थी 3 | जि.प.प्राथ.शाळा,वायगाव | ४ |
| 4 | अध्ययनार्थी 4 | जि.प.प्राथ.शाळा,वायगाव | २ |
| 5 | अध्ययनार्थी 5 | जि.प.प्राथ.शाळा,वायगाव | ५ |
| 6 | अध्ययनार्थी 6 | जि.प.प्राथ.शाळा,वायगाव | १ |
| 7 | अध्ययनार्थी 7 | जि.प.प्राथ.शाळा,चांदेश्वर | ६ |
| 8 | अध्ययनार्थी 8 | जि.प.प्राथ.शाळा,चांदेश्वर | ४ |
| 9 | अध्ययनार्थी 9 | जि.प.प्राथ.शाळा,किष्टापूर | ३ |
| 10 | अध्ययनार्थी 10 | जि.प.प्राथ.शाळा,सगनापूर | २ |
| 11 | अध्ययनार्थी 11 | जि.प.प्राथ.शाळा,रश्मीपूर | ३ |
| 12 | अध्ययनार्थी 12 | जि.प.प्राथ.शाळा,प्रियदर्शनी | १ |
| | एकूण | | ३५ |

Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

**न्यादर्श निवड पध्दती :-**

प्रस्तुत संशोधनासाठी गडचिरोली जिल्हातर्गत चामोर्शी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षण घेणारे दिव्यांग विद्यार्थ्यांची सहेतुक पद्धतीने निवड केली आहे.

**माहिती संकलनाची साधने :-**

1) दिव्यांग बालकांसाठी अध्ययन स्तर वर आधारित पूर्व चाचणी
2) दिव्यांग बालकांचे अध्ययन स्तर निश्चित करून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी येणाऱ्या समस्या व आव्हानांचा शोध घेण्यासाठी शिक्षकांच्या मुलाखती
3) दिव्यांग बालकांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी 60 दिवसीय सहशालेय उपक्रम
4) दिव्यांग बालकांमध्ये गुणवत्तापूर्ण उपक्रम/ उपाययोजनांचा राबविल्यानंतर परीणामकारकता अभ्यासण्यासाठी अध्ययन स्तर वर आधारित उत्तर चाचणी

| **अनु.क्र** | **उद्दिष्टे** | **माहिती संकलनाची साधने** |
|---|---|---|
| 1) | दिव्यांग बालकांचे अध्ययन स्तर निश्चित करून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे. | पूर्व चाचणी , |
| 2) | दिव्यांग बालकांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी येणाऱ्या अडचणीं व आव्हानांचे विश्लेषण करणे | मुलाखत, विश्लेषण सूची |
| 2) | दिव्यांग बालकांचा अध्ययन स्तर निश्चित करून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी उपाययोजनांचा परिणाम अभ्यासणे | 60 दिवसीय सहशालेय उपक्रम व उत्तर चाचणी |

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**संशोधन कार्यवाही :-**

संशोधकाने सर्वप्रथम कृतीकार्यक्रमाचा आराखडा तयार करून त्यानंतर खालीलप्रमाणे उपक्रम राबविण्यात आले.

**उपक्रम वेळापत्रक :-**

| अनु.क्र | उपक्रम | दैनिक तास | कालावधी |
|---|---|---|---|
| 1) | दिव्यांग बालकांना शोध घेणे. | 3 तास | 5 दिवस |
| 2) | दिव्यांग बालकांना अध्यापन करणाऱ्या शिक्षकांच्या मुलाखती घेणे. | 3 तास | 5 दिवस |
| 3) | दिव्यांग बालकांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी येणाऱ्या समस्या व आव्हानांची विश्लेषणात्मक सूची तयार करणे. | - | 3 दिवस |
| 4) | केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेचे आयोजन करणे. | 5 तास | 1 दिवस |
| 5) | तालुकास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करणे. | 6 तास | 2 दिवस |
| 6) | विद्यार्थी गट निहाय अध्ययन-अध्यापन अनुभव देणे. | 2 तास | 60 दिवस |
| 7) | विद्यार्थी व वर्गशिक्षकांचे उद्बोधन वर्ग आयोजन | 5 तास | 1 दिवस |
| 8) | रात्र अभ्यासिका वर्ग घेणे | 1 तास | 10 दिवस |
| 9) | ज्ञानरचनावादी वर्ग अध्यापन, विद्यार्थ्यांच्या क्षमतानुसार अध्ययन अनुभव देणे. | 1 तास | 60 दिवस |
| 10) | नियमित स्वयंअध्ययन करणे. | 1 तास | 60 दिवस |

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**उद्दिष्टे १ : दिव्यांग बालकांचे अध्ययन स्तर निश्चित करून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.**

**अध्ययन स्तर निश्चितबाबत माहिती मिळविण्यासाठी** सदर शाळेतील दिव्यांग विद्यार्थ्यांने वर्गानुसार कोणत्या अध्ययन स्तर पूर्ण केली नाही हे जाणून घेण्यासाठी सर्वप्रथम सबंधित विद्यार्थ्यांची अध्ययन स्तर आधारित 20 गुणांची पूर्व चाचणी घेण्यात आली व पूर्व चाचणीचे विश्लेषण करून अध्ययन स्तर निश्चित आले.

**पूर्व चाचणीचे विश्लेषण**

| अ. क्र. | विदयार्थ्याचे नाव | शाळेचे नाव | प्राप्त गुण |
|---|---|---|---|
| 1 | अध्ययनार्थी १ | जि.प.प्राथ.शाळा,दुर्गापूर | २ |
| 2 | अध्ययनार्थी २ | जि.प.प्राथ.शाळा,अड्याळ | २ |
| 3 | अध्ययनार्थी ३ | जि.प.प्राथ.शाळा,वायगाव | ४ |
| 4 | अध्ययनार्थी ४ | जि.प.प्राथ.शाळा,वायगाव | २ |
| 5 | अध्ययनार्थी ५ | जि.प.प्राथ.शाळा,वायगाव | ५ |
| 6 | अध्ययनार्थी ६ | जि.प.प्राथ.शाळा,वायगाव | १ |
| 7 | अध्ययनार्थी ७ | जि.प.प्राथ.शाळा,चांदेश्वर | ६ |
| 8 | अध्ययनार्थी ८ | जि.प.प्राथ.शाळा,चांदेश्वर | ४ |
| 9 | अध्ययनार्थी ९ | जि.प.प्राथ.शाळा,किष्टापूर | ३ |
| 10 | अध्ययनार्थी १० | जि.प.प्राथ.शाळा,सगनापूर | २ |
| 11 | अध्ययनार्थी ११ | जि.प.प्राथ.शाळा,रश्मीपूर | ३ |
| 12 | अध्ययनार्थी १२ | जि.प.प्राथ.शाळा,प्रियदर्शनी | १ |
| | एकूण | | ३५ |

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

## पूर्व चाचणीत आढळून आलेले अध्ययन स्तर

| अ. क्र. | विदयार्थ्यांचे नाव | मराठी | | | | | | | | | गणित | | | | | | | इंग्रजी | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रारंभिक | अक्षर | शब्द | जोडाक्षरयुक्त शब्द | वाक्य | परिच्छेद | अनुलेखन | श्रुतलेखन | अभिव्यक्ती | प्रारंभिक | अंकओळख | संख्याज्ञान | बेरीज | वजाबाकी | गुणाकार | भागाकार | beginners | letter | picture | words | sentence | paragraph | transaction | dictation | expression |
| 1 | अध्ययनार्थी 1 | | | | √ | | | | | | | √ | | | | | | | √ | | | | | | | |
| 2 | अध्ययनार्थी 2 | | | | | | √ | | | | √ | | | | | | | √ | | | | | | | | |
| 3 | अध्ययनार्थी 3 | | | | √ | | | | | | | √ | | | | | | | √ | | | | | | | |
| 4 | अध्ययनार्थी 4 | | | | | | √ | | | | | √ | | | | | | | √ | | | | | | | |
| 5 | अध्ययनार्थी 5 | | | | √ | | | | | | | | √ | | | | | | | √ | | | | | | |
| 6 | अध्ययनार्थी 6 | | | | √ | | | | | | | √ | | | | | | | √ | | | | | | | |
| 7 | अध्ययनार्थी 7 | | | | | | √ | | | | | √ | | | | | | | √ | | | | | | | |
| 8 | अध्ययनार्थी 8 | | | | √ | | | | | | √ | | | | | | | √ | | | | | | | | |
| 9 | अध्ययनार्थी 9 | | | | √ | | | | | | | √ | | | | | | | √ | | | | | | | |
| 10 | अध्ययनार्थी 10 | | | | | | √ | | | | | | √ | | | | | | | √ | | | | | | |
| 11 | अध्ययनार्थी 11 | | | | | | √ | | | | √ | | | | | | | √ | | | | | | | | |
| 12 | अध्ययनार्थी 12 | | | | √ | | | | | | | √ | | | | | | | √ | | | | | | | |

या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी प्रायोगिक पद्धती वापरण्यात आली व त्या अंतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांना शिकवित असणाऱ्या 8 शिक्षकांच्या मुलाखती घेण्यात आल्या.

**उद्दिष्टे २ : दिव्यांग बालकांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी येणाऱ्या अडचणीं व आव्हानांचे विश्लेषण करणे**

विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी वेळोवेळी शिक्षक या नात्याने आपल्याला आलेल्या आव्हानांचा, अडचणी/समस्यांचा शोध शिक्षक घेत असतो. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांचे अध्ययन स्तर निश्चित करून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी शिक्षकांना काही आव्हानांना सामोरे जावे लागले. जसे- कर्णबधिर मुलांचा अध्ययन स्तर कसा निश्चित करावा? अंध मुलांचा स्तर कसा निश्चित करावा? अशा दिव्यांगांतील 21 प्रकार निहाय आव्हाने वेगवेगळी होती. मात्र अशा वेळी अध्ययन शैली नुसार विशेष गरजा असणाऱ्या CWSN मुलांचे अध्ययन स्तर निश्चिती (विश्लेषण) करण्यासाठी विविध अडचणींना सामोरे जावे लागते अशा अडचणींची माहिती मुलाखतीद्वारे घेण्यात आली व प्राप्त माहितीनुसार उच्च व निम्न

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

स्तरावरील आव्हानांची विश्लेषणात्मक सूची तयार करून शोध घेण्यात आला तेव्हा खालीलप्रमाणे दिव्यांग बालकांच्या समस्या, आव्हाने दिसून आली .

**मुलाखत घेण्यात आलेल्या शिक्षकांची यादी**

| अ. क्र. | विदयार्थ्याचे नाव | शाळेचे नाव |
|---|---|---|
| 1 | श्री, ज्योतिष सुधांशू मंडल | जि.प.उच्च. प्राथ.शाळा,दुर्गापूर |
| 2 | श्रीमतो रुंदाताई रवींद्र इष्टाम | जि.प. उच्च .प्राथ.शाळा,अड्याळ |
| 3 | श्री, प्रकाश आडकुजी गेडाम | जि.प.प्राथ.शाळा,वायगाव |
| 4 | श्री, अनिल मुकुंदराव अल्लमवार | जि.प.प्राथ.शाळा,चांदेश्वर |
| 5 | श्री, शिवराज एस नाईकवाडे | जि.प.प्राथ.शाळा,किष्टापूर |
| 6 | श्री, गजानन दिवाकर साळवे | जि.प.प्राथ.शाळा,सगनापूर |
| 7 | श्री, अरुण तानुजी तलांडे | जि.प.प्राथ.शाळा,रश्मीपूर |
| 8 | श्री, किसान मनिराम झाडे | जि.प.प्राथ.शाळा,प्रियदर्शनी |

दिव्यांग विद्यार्थ्यांना शिकवित असणाऱ्या वरील 8 शिक्षकांच्या मुलाखती घेतल्यानंतर खालीलप्रमाणे दिव्यांग बालकांच्या समस्या, आव्हाने दिसून आली

१) नियमित शाळेत न येणे. शाळेत वर्गात पूर्ण वेळ न थांबणे.

२) अध्ययन शैली (दृक,श्राव्य,स्पर्श,बहुअध्ययन शैली) प्रमाणे अध्ययन अनुभवाचा अभाव

३) शिकवलेले लक्षात न राहणे, विस्मरण होणे.

४) स्वयंअध्ययनाचा अभाव

५) शिकण्याची गती कमी (आकलन क्षमता कमी) असल्याने नियमित सातत्य, सरावाचा अभाव, अध्ययनात अप्रत्यक्षपणे दुर्लक्ष

६) एका जागेवर स्थिर बसत नाही. (वर्तनसमस्या )

७) बहुभाषिक अध्ययनार्थी

Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

८) आदिवासी व बांग्ला बोलीभाषेचा प्रभाव

९) पालक, शिक्षकांमध्ये असुरक्षितता व आपुलकीची भावना कमी असणे

१०) घरापासुन शाळेचे अंतर लांब असल्याने नियमित शाळेत येण्याबाबत समस्या

११) पालकांचे स्थलांतर

१२) बहुवर्ग जबाबदारी, पटसंख्या जास्त असल्याने उच्च स्तर विद्यार्थी, पाठ्यक्रम व निम्न स्तर विद्यार्थी तयारी करून घेण्याबाबत आव्हान

१३) माध्यमिक शाळामध्ये जास्त पटसंख्या व विषय शिक्षक असल्याने अध्ययन स्तर गाठण्याची जबाबदारी व कार्यवाही याबाबत संभ्रम त्यामुळे अप्रत्यक्षपणे दुर्लक्ष

१४) अध्ययन अध्यापन प्रक्रियेत शैक्षणिक साहित्याचा योग्य वापर करण्याचा अभाव

१५) बौद्धिक अक्षमता असणाऱ्या बालकाकडून सामान्य विद्यार्थ्याबरोबरीने प्रगती व्हावी असा अट्टहास धरल्याने अपेक्षित यश मिळत नाही, म्हणून अप्रत्यक्षपणे दुर्लक्ष.

१६) अध्ययन-अनुभवात विद्यार्थीच्या गरजेनुसार बदल करण्याची आवश्यकता असते मात्र त्याची पूर्तता होताना दिसून येत नाही.

१७) वर्गशिक्षकांचे अवांतर कामे, बहुवर्ग जबाबदारी, जास्त पटसंख्या बहुवर्ग यामुळे ताण-तणावाचे व्यवस्थापन करण्यात गोंधळ त्याचा अध्ययन-अध्यापन प्रक्रियेवर परिणाम.

१८) पालकांची उदासिनता, विद्यार्थ्याच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष

**उद्दिष्टे ३ : दिव्यांग बालकांचा अध्ययन स्तर निश्चित करून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी उपाययोजनांचा परिणाम अभ्यासणे**

या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी शिक्षकाची भूमिका निश्चित करून दिव्यांग बालकांच्या अध्ययन स्तराच्या निम्न व उच्च स्तरावरील समस्या व आव्हानांचा शोध घेऊन आवश्यक

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

परिस्थितीनुसार शिक्षकांचे उपक्रम असा एकत्रित विचार करून या दृष्टीने खालीलप्रमाणे सहशालेय उपक्रम व उपाय योजना तयार करून राबविण्यात आल्या व निष्कर्ष काढण्यात आले

**उपाययोजना**

१) बहुवर्ग, पटसंख्या जास्त असणाऱ्या शाळामध्ये विद्यार्थी गट निहाय अध्ययन- अनुभव देणे अध्यापन करणे.

२) ज्ञानरचनावादी वर्ग, कृतियुक्त अध्ययन अनुभव, डिजिटल क्लासरूम, E-learning द्वारे अध्ययन अनुभव, दृकश्राव्य माध्यमांचा प्रभावी वापर यासाठी शिक्षकांना प्रोत्साहित करणे.

३) अध्ययन शैली, दृक-श्राव्य, स्पर्श, बहुअध्ययन शैली बाबत वर्गशिक्षकांना अवगत करणे.

४) केंद्रस्तरीय शिक्षण परिषद, तालुकास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करणे.

५) शैक्षणिक सहाय्यभूत सेवा मिळाव्यात यासाठी वैद्यकीय दृष्टीकोन व अध्ययनार्थी दृष्टीकोन बाबत पालक, वर्गशिक्षक यांचे सक्षमीकरण करणे.

६) विद्यार्थीना बोलीभाषेतून अध्ययन अनुभव देण्यासाठी अभ्यास साहित्य उपलब्धता यासाठी पालक, वर्गशिक्षकांना प्रोत्साहित करणे.

७) उपलब्ध वाचन साहित्य, गणित साहित्य पेटीतील साहित्याचा प्रभावी व नियमित वापर करण्यासाठी विद्यार्थी व वर्गशिक्षकांना मार्गदर्शन करणे.

८) पालक, शिक्षकांमधील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या बाबतीत असुरक्षित भावना दूर करण्यासाठी शाळेत पूर्ण वेळ थांबणे, वर्गात सहभाग यासाठी सवंगडी, पालक, वर्गशिक्षक यांना समुपदेशन करणे यासाठी विशेष साधन शिक्षकांच्या माध्यमातून आवश्यकतेनुसार आठवडातून किमान एक दिवसाचे Day Care सेंटर सुरु करणे.

९) पालकांचे मुलांच्या गुणवत्तेविषयी उदबोधन कार्यशाळा घेऊन समुपदेशन करणे.

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

१०) निम्न स्तरातील विद्यार्थ्यांना उच्च स्तरातील विद्यार्थ्यांसोबत सहध्ययन करण्यास मार्गदर्शन करणे.

११) विद्यार्थी नियमित शाळेत उपस्थित राहणे.

१२) शिकवतांना विद्यार्थ्यांची एकाग्रता टिकुन कशी राहील या कडे लक्ष देणे.

१३) विद्यार्थ्यांनी वर्गकार्य, गृहकार्य वेळेत पूर्ण करणे.

१४) विद्यार्थ्यांनी स्वयंअध्ययन व नियमित सातत्य ठेऊन सराव करणे.

१५) अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत कृतियुक्त अध्ययन अनुभव व प्रत्यक्ष अनुभवाचा समावेश करणे

१६) नियमित 1 तास ( सायं. 7 ते 8 वा ) रात्र अभ्यासिका वर्ग

१७) दृक-श्राव्य माध्यमांचा म्हणजेच डिजिटल क्लासरूम, e-learning, Audio, Videos प्रभावी वापर

१८) ज्ञानरचनावादी वर्गात सर्वांना संधी व सर्वांचा सक्रिय सहभाग करून घेणे.

१९) विद्यार्थ्यांचा अंगणवाडी पासून ते प्राथमिक तसेच उच्च प्राथमिक वर्गात पायाभक्कम करून घेतल्याने उच्च स्तरावर पोहोचतांना फारशा अडचणी येत नाही या बाबत माहिती विद्यार्थ्यी व पालकांना समजावून सांगणे.

२०) बहुवर्ग अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत SMC मार्फत गावातील होतकरू 12 वी , BA,Bsc,Ded पास झालेल्या विद्यार्थ्याकडून बेसिक गोष्टी शिकवण्यासाठी मदत करून घेणे.

२१) विद्यार्थ्यांच्या प्रगतीकडे तसेच शालेय अध्ययन- अध्यापनाकडे पालकांचे विशेष लक्ष केंद्रित करणे

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

२२) विद्यार्थ्यांच्या क्षमता, गरजा ओळखून त्यांच्या शिकण्याच्या गतीने आनंददायी व सहज पद्धतीने (मुलांची मानसिकता ओळखून) अध्ययन अनुभव देणे.

उपरोक्त उपक्रम प्रभावीरित्या 60 दिवस सातत्याने राबविण्यात आले व उत्तर चाचणी घेण्यात आली व विद्यार्थ्यांच्या वर्तन बदलाबाबत सबंधित शिक्षकांची मते जाणून घेतले असता खालीलप्रमाणे निष्कर्ष दिसून आले.

## उत्तर चाचणीचे विश्लेषण

| अ. क्र. | विदयार्थ्याचे नाव | शाळेचे नाव | प्राप्त गुण |
|---|---|---|---|
| 1 | अध्ययनार्थी 1 | जि.प.प्राथ.शाळा,दुर्गापूर | १४ |
| 2 | अध्ययनार्थी 2 | जि.प.प्राथ.शाळा,अड्याळ | १२ |
| 3 | अध्ययनार्थी 3 | जि.प.प्राथ.शाळा,वायगाव | १७ |
| 4 | अध्ययनार्थी 4 | जि.प.प्राथ.शाळा,वायगाव | १५ |
| 5 | अध्ययनार्थी 5 | जि.प.प्राथ.शाळा,वायगाव | १५ |
| 6 | अध्ययनार्थी 6 | जि.प.प्राथ.शाळा,वायगाव | १७ |
| 7 | अध्ययनार्थी 7 | जि.प.प्राथ.शाळा,चांदेश्वर | १९ |
| 8 | अध्ययनार्थी 8 | जि.प.प्राथ.शाळा,चांदेश्वर | १३ |
| 9 | अध्ययनार्थी 9 | जि.प.प्राथ.शाळा,किष्टापूर | ९ |
| 10 | अध्ययनार्थी 10 | जि.प.प्राथ.शाळा,सगनापूर | ११ |
| 11 | अध्ययनार्थी 11 | जि.प.प्राथ.शाळा,रश्मीपूर | ७ |
| 12 | अध्ययनार्थी 12 | जि.प.प्राथ.शाळा,प्रियदर्शनी | १७ |
| | एकूण | | १६६ |

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

## उत्तर चाचणीनंतर बदललेले अध्ययन स्तर

| अ. क्र. | विदयार्थ्यांचे नाव | मराठी | | | | | | | | | गणित | | | | | | | इंग्रजी | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रारंभिक | अक्षर | शब्द | जोडाक्षरयुक्त शब्द | वाक्य | परिच्छेद | अनुलेखन | श्रुतलेखन | अभिव्यक्ती | प्रारंभिक | अंकओळख | संख्याज्ञान | बेरीज | वजाबाकी | गुणाकार | भागाकार | beginners | letter | picture | words | sentence | paragraph | transaction | dictation | expression |
| 1 | अध्ययनार्थी 1 | | | | | | | √ | | | | | | | √ | | | | | | | | | | √ | |
| 2 | अध्ययनार्थी 2 | | | | | | | | | √ | | | | √ | | | | | | | | | | √ | | |
| 3 | अध्ययनार्थी 3 | | | | | | | √ | | | | | | | √ | | | | | | | | | | √ | |
| 4 | अध्ययनार्थी 4 | | | | | | | | | √ | | | | | √ | | | | | | | | | | √ | |
| 5 | अध्ययनार्थी 5 | | | | | | | √ | | | | | | | | √ | | | | | | | | | | √ |
| 6 | अध्ययनार्थी 6 | | | | | | | √ | | | | | | | √ | | | | | | | | | | √ | |
| 7 | अध्ययनार्थी 7 | | | | | | | | | √ | | | | | √ | | | | | | | | | | √ | |
| 8 | अध्ययनार्थी 8 | | | | | | | √ | | | | | | √ | | | | | | | | | | √ | | |
| 9 | अध्ययनार्थी 9 | | | | | | | √ | | | | | | | √ | | | | | | | | | | √ | |
| 10 | अध्ययनार्थी 10 | | | | | | | | | √ | | | | | | √ | | | | | | | | | | √ |
| 11 | अध्ययनार्थी 11 | | | | | | | | | √ | | | | √ | | | | | | | | | | √ | | |
| 12 | अध्ययनार्थी 12 | | | | | | | √ | | | | | | | √ | | | | | | | | | | √ | |

पूर्व चाचणी प्राप्त गुण

मध्यमान = 2.91

उत्तर चाचणी प्राप्त गुण

मध्यमान = 13.83

**फरक = 10.91**

**निष्कर्ष-**

१) विद्यार्थी नियमित शाळेत न येऊन वर्गात पूर्ण वेळ थांबू लागली

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

२) अध्ययन शैली ( दृक,श्राव्य,स्पर्श,बहुअध्ययन शैली ) प्रमाणे अध्ययन अनुभवाचा वापर होऊ लागला त्यामुळे शिकवलेले आशय अधिक काळ स्मरणात राहू लागले.

३) स्वयंअध्ययनामुळे अध्ययन-अध्यापनात रंजकता निर्माण झाली.

४) शिकण्याची गती कमी (आकलन क्षमता कमी) असल्याने नियमित सातत्य , सरावाचा अभाव, अप्रत्यक्षपणे दुर्लक्ष या सारख्या समस्याचे निराकरण झाले

५) विद्यार्थी एका जागेवर स्थिर बसून अध्ययन करू लागले. (वर्तनसमस्या )

६) विद्यार्थी बोलीभाषा बरोबरच प्रमाण भाषेचा वापर करू लागले

७) पालक, शिक्षकांमध्ये सुरक्षित व आपुलकीची भावना निर्माण होण्यास मदत झाली.

८) घरापासुन शाळेचे अंतर लांब असल्याने नियमित शाळेत येण्याबाबत समस्या पालकांच्या सहकार्यामुळे कमी झाली.

९) मुलांच्या शिक्षणासाठी पालकांचे स्थलांतर कमी झाले.

१०) गट-गटाने अध्यापन केल्यामुळे बहुवर्ग अध्यापन जबाबदारी, पटसंख्या जास्त असल्याने उच्च स्तर विद्यार्थी, पाठ्यक्रम व निम्न स्तर विद्यार्थी तयारी करून घेण्याबाबत समस्या कमी झाली

११) शाळामध्ये जास्त पटसंख्या व विषय शिक्षक असल्याने अध्ययन स्तर गाठण्याची जबाबदारी व कार्यवाही याबाबत संभ्रम व दिव्यांग विद्यार्थ्यांकडे अप्रत्यक्षपणे दुर्लक्ष होणे नाहीसे झाले

१२) अध्ययन -अध्यापन प्रक्रियेत शैक्षणिक साहित्याचा योग्य वापर करण्यात आल्याने कमी वेळात अपेक्षित उद्दिष्टे साध्य करण्यास मदत झाली.

१३) बौद्धिक अक्षमता असणाऱ्या बालकांची सामान्य विद्यार्थ्यांबरोबरीने प्रगती व्हावी असा अट्टहास धरल्याने अपेक्षित यश मिळत नाही, ही मानसिकता नाहीशी झाली.

१४) अध्ययन- अनुभवात विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार बदल करण्याची आवश्यकता असते व त्याची पूर्तता झालेली दिसून आली

१५) वर्गशिक्षकांचे अवांतर कामे , बहुवर्ग जबाबदारी ,जास्त पटसंख्या बहुवर्ग यामुळे ताण-तणावाचे व्यवस्थापन होतांना दिसून आले व त्याचा प्रत्यक्ष अध्ययन-अध्यापन प्रक्रियेवर सकारात्मक परिणाम दिसून आला.

१६) पालकांची उदासिनता नाहीशी झाली, विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकडे पालकांनी लक्ष देऊ लागले.

Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

## परिशिष्ट

### संदर्भ – वेबसाईट


१) https://www.samaveshitshikshan.com/२०२०/०५/Challenges-for-disabled-children-cwsn.html

२) https://www.loksatta.com/career-vrutantta/career-vruttant-teacher-education-students-teaching-४२८१/


### जर्नल लेख-


१) बेन को,१०, ऑक्टोबर २०१५, Pages ४४३-४४९, शैक्षणिक आरोग्य आणि काळजी योजना: २०१४ पासून इंग्लंडमधील विशेष शैक्षणिक गरजा आणि अपंगत्व तरतुदींसाठी एक नवीन योजना

२) सुसान एम. हॅव्हरकॅम्प, वेस्ली आर. बर्नहार्ट, सप्टेंबर २०२०.अपंगत्वाबद्दल आपण काय शिकवले पाहिजे? आरोग्य सेवा शिक्षणासाठी अपंगत्व क्षमतांवर राष्ट्रीय एकमत

३) जुलियाना लुस्टोसा टोरेस ,,लिगिया पॅसिनी लुस्टोसा, जानेवारी - फेब्रुवारी २०१९, Pages १२०-१२४, समाजात राहणाऱ्या वृद्ध प्रौढांमधील अपंगत्व आणि नैराश्याची लक्षणे यांच्यातील संबंधांवर शिक्षणाची भूमिका: ब्राझिलियन वृद्ध लोकांमध्ये फ्रायल्टीचा पुरावा (फायब्रा) अभ्यास


### पुस्तके -


*१)* महेंद्रनाथ पाठक, *(२०१८)* दीनदयाल उपाध्याय गोरखपुर विश्वविद्यालय गोरखपुर यांच्या "विशिष्ट बालको का उनकी बुद्धी, अभिक्षमता, सृजनात्मकता तथा अधिगम क्षमता के संबंध में अध्ययन "

*२)* मथ्यु मिनी, *(२०१६)*बौद्धिक अपंगत्व असलेल्या प्रौढाच्या कार्यक्षम क्षमता आणि समस्या,महात्मा गांधी विद्यापीठ,कोत्तायम.केरळ

*३)* गोयल मोना, *(२०१५)* अपंग व्यक्तींच्या हक्काशी संबंधित कायदा,गुरूनानक देव विद्यापीठ,अमृतसर.

*४)*मोरे विठ्ठल प्रभाकर राव ( *२०११)* यांना "अस्थिव्यंग अपंग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये येणाऱ्या अडचणी- एक चिकित्सक अभ्यास "


*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

५) त्रिपाठी सुनीता, *(२०१७)*दिव्यांग महिलांच्या सामाजिक आर्थिक सक्षमीकरणाचा अभ्यास,विद्यापीठ, लखनौऊ.

६) खिस्ती मोनिका सुरेश, *(२००८)*, अपंग व्यक्ती आणि सामान्य व्यक्ती यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये आणि समायोजन यांचा तुलनात्मक अभ्यास, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

७) अपंग समवेशीत शिक्षण, *(२००४)* महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,मुंबई .

८) संशोधन पद्धती, *(२०१४)* यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

९) संशोधनाची साधने आणि नमुना निवड, *(२००९)*, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**Cite Your Article as:**

*Sachin Bhaskar Kulsange & Dr. Madhuri Sonawane. (2024). DIVYANG BALKANCHYA SAMASYA ANI AAVAHANATMAK UPKRUM NIRMITI KARUN TYACHI PARINAMKARAKTA ABHYASANE. In Scholarly Research Journal for Interdisciplinary studies (Vol. 12, Number 80, pp. 171–188). Zenodo. https://doi.org/10.5281/zenodo.10554389*

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*